अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई — ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :— ०२.०२.२०२४

# प्रेसनोट

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०२/२०२४ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | १) श्री अर्जुन प्रकाश सुर्यवंशी, सहा. राज्यकर आयुक्त,<br>२) इतर अधिकारी व कर्मचारी, वस्तू व सेवाकर विभाग, माझगाव, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रोख रूपये ०१ कोटी |
| थोडक्यात माहिती | मा. विशेष राज्यकर आयुक्त तथा मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना वस्तू व सेवाकर विभाग, माझगाव, मुंबई येथील अन्वेषण-क विभागातील कार्यरत अधिकारी यांनी अन्वेषणा दरम्यान केलेल्या भ्रष्टाचाराची भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ नुसार सखोल चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्याकरीता पत्र पाठविले होते. मा. महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदरहू प्रकरण या कार्यालयास वर्ग केले होते.<br><br>वस्तू व सेवाकर विभाग, माझगाव, मुंबई येथील अन्वेषण- क विभागातील कार्यरत आलोसे श्री. अर्जुन प्रकाश सुर्यवंशी, सहा. राज्यकर आयुक्त व त्यांच्या पथकातील इतर अधिकारी यांची चौकशी केली असता, असे निष्पन्न झाले की, यातील करदाते हे संचालक असलेल्या वाशी, नवीमुंबई येथील आस्थपनेवर थकीत जी.एस.टी. भरणा रक्कमेच्या अनुषंगाने दिनांक २५/०७/२०२३ ते दिनांक ०७/०८/२०२३ रोजी पर्यंत अन्वेषण / झडती कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर सदर कार्यवाहीत मदत करण्यासाठी करदाते यांचेवर अनुग्रह दाखवून दिनांक २१/०८/२०२३ रोजी आलोसे क्र. १ यांनी कायदेशीर परिश्रमाखेरीज परितोषण म्हणून व्हॉट्सॲप मेसेज द्वारे रू. ०१ कोटी रोख लाचेची मागणी केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. तसेच सदर लाचेची मागणी कृत्यामध्ये वस्तू व सेवाकर विभाग, माझगाव, मुंबई विभागातील इतर अधिकार व कर्मचारी यांचा सहभाग नाकारता येत नसल्याने श्री. अर्जुन प्रकाश सुर्यवंशी, सहा. राज्यकर आयुक्त, व इतर अधिकारी व कर्मचारी, वस्तू व सेवाकर विभाग, माझगाव, मुंबई यांचेविरूध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम २०१८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.
श्री. राजेंद्र सांगळे सो, अपर पोलीस उप आयुक्त,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बृहन्मुंबई विभाग.
श्री. भागवत सोनावणे सो, अपर पोलीस उप आयुक्त,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बृहन्मुंबई विभाग.

( नितीन दळवी )
महाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३०
संकेतस्थळ - acbmaharastra.gov.in,
ईमेल- १) acbwebmail@mahapolice.gov.in, २) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार अर्ज-www.acbmaharastra.net. टोल फ्रि. क्र. १०६४
दुरध्वनी क्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००